# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २३.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २२/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६०,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२२/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन हटटा ०३,हटटा ०१ असे एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १६.०२ लिटर दारू असा एकुण ५८,६७०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.२२/०८/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली ग्रा.०१,बासंबा येथे ०१असे एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण २,३३०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :— दिनांक २२/०८/२०२२ रोजी फिर्यादी सुधाकर कलाकर सिदलंबे व्य.नौकरी रा.औरंगाबाद ह.मु.बन्सीलाल नगर जवळा बाजार ता.औढा ना.जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ४५७,३८०,५११ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२०.०८.२२ रोजी चे १८:०० ते दि.२२.०८.२२ रोजी चे ०७:३० वा चे दरम्याण आसोला पाटीवर स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा असोला तर्फे औढा ना येथे यातील फिर्यादी नौकरीस असलेल्या स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा आसोला तर्फे औढा येथे कोणीतरी अज्ञात चोरटयांने बॅक शाखाचे पाठीमागली चॅनल गेट चे कुलुप तोडुन तसेच दरवाज्याचे कुलुप तोडुन दरवाजा उघडुन बॅकेमध्ये प्रवेश करून बॅकेत लावलेले सर्व सी.सी.टी.व्हि. कॅमेऱ्याचे विद्युत पुरवठयाचे वायर तोडुन बॅकमध्ये असलेल्या मुख्य तिजोरी गॅस कटरने तोडयण्याचा प्रयत्न करून त्यामध्ये नगदी रोख रक्कम व सोन्याचे दागीने चोरी करण्याचा प्रयत्न केलेला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २२/०८/२०२२ रोजी फिर्यादी भागवत तुळशीराम चामले व्य.नौकरी रा.जवळा बाजार ता.औढा ना.जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१९.०८.२२ रोजी चे २०:०० वा पासुन ते २०.०८.२२ रोजी चे ०५:०० वा चे दरम्यण फिर्यादीचे घरासमोर मौजे वळा बाजार येथे यातील फिर्यादीने त्यांचे घरासमोर लावलेली हिरो होंन्डा कंपणीची मो.सा.क्र एम.एच.३८ एस ७७०३ कि.४०,००० रू हि कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भत हटटा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २२/०८/२०२२ रोजी फिर्यादी पंजाब कुडलीकराव निळकंठे रा.सोडेगाव ता.कळमनुरी जि. हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. २१.०८.२२ रोजी चे १८:३० ते २२.०८.२२ रोजी चे ०६:०० वा चे दरम्याण मौजे सोडेगाव शिवारात यातील फिर्यादीचे गट नं १९६ मधील फिर्यादी व फिर्यादीचे शेत शेजारी यांचे शेतातील मिळुन ६००० झेंडुची रोपे कि.अं. २४,००० रू कोणी तरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.